भोकपत्र दि. 14.07.2023

# घरफोड्या, जबरी चोरी, लुटमार करणाऱ्या गुन्हेगारांना किनवट पोलिसांकडून अटक

**किनवट/ता.प्रतिनिधी**

किनवट आणि गोकुंदासह ल्लापूर, भोकर, हदगाव, हिम ातनगर, माहूर व तामसा या ठकाणी जबरीचोरी, घरफोड्या, ुटमार करणाऱ्या टोळीने सर्वांना ादरुन सोडले तर होतेच. पोलीस शासनाच्या नाकीदम आणणार्या ाळीचा अखेर किनवट ालीसांनी पर्दाफाश केला. ्कनवट शहरातील गंगानगर ाणि गोकुंद्यातील दत्तनगर थिल दहा कुख्यातांविरुद्ध खलपात्र गुन्ह्याची नोंद करुन ांहींना चतुर्भूज केले असल्याचे २ जुलै रोजी सुत्रांनी प्रेसनोट ारा प्रसिद्धी माध्यमांना कळविले ाहे. पोलीस तपासातून या न्ह्यातील मालमुद्यांपर्यंतची क्रल झाल्यानंतर कोणकोणाचे ात बरबटले हे समोर येणार हे ाशेष.

सुनिल चिमनाजी मेटकर ्वय वर्ष १९) गंगानगर/दत्तनगर, ार्यन हनुमंत देवकर (वय वर्ष ९) गंगानगर, आकाश लक्ष्मण ऊत (वय वर्ष १८) दत्तनगर, ागेश बाबू गोरे (वय वर्ष २२) गानगर यांच्याविरुद्ध भादवि. ्लम ४५४, ३८०, ३९२, ४ अन्वये गुन्हे नोंदऊन अटक ्लीय. चौकशी दरम्यान त्यांनी ्नेश मल्लया मक्कडवार, प्रकाश ्वार, करण पिटलेवाड, कृष्णा टकर व दीपक सोळंके सामिल ासल्याची कबुली दिली. त्यांचीही बारकाईने झाडाझडती घेतल्यानंतर त्यांनी धक्कादायक खुल्लाशे केले असून, यात आणखी अल्पवयीन गुन्हेगारांचा भरणा असल्याची व गुन्हे घडविल्याची कबुली दिल्याचे प्रेसनोटमध्ये नमूद केले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, भोकरचे अपर पोलीस अधीक्षक धरणे आणि किनवटचे पोलीस उपअधीक्षक शिनगारेंच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दीपक बोरसे, सपोनि वाठोरे, पोउनि मामीडवार, सावंत, पोहेकॉ वाडगुरे, पोहेकॉ राठोड, पोहेकॉ आत्राम, पोहेकॉ लखुळे, पोहेकॉ डुकरे. निपोकॉपाटोदे, नापोकॉ. दोनकलवार, पोकॉ कागणे, पोकॉ अनंतवार, पोकॉ राजणे, पोकॉ रापतवार, पोकॉ वानखेडे, मपोकॉ कुरे यांनी या टोळीचा पर्दाफाश करण्यास महत्वाची भूमिका बजावली असल्याचे सांगण्यात आले. पुढील तपासाची चक्रे गतीमान केली असून पोउनि सावंत व पोकॉ वाडगुरे यांच्याकडे कार्यभार सोपवला आहे. या गुन्ह्यातील दागिने असतील तर ते दागिने आजमितीस कुठे आहेत ? रोकड असेल तर तिची विल्हेवाट कशी लावली ? मुळापर्यंत तपास पोहोचल्यास या टोळीचे पाठिराखे कोण कोण आहेत ? हे समोर येऊ शकते.

भोकपत्र दि. 14.07.2023